मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | शुनिवार, दि. 19 जुलै 2025 | पान- 1

# महापालिकेच्या तिजोरीत 544 कोटीचा कर जमा

## शहरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता कर भरला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिक मोठ्या प्रमाणात ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता कर भरला आहे. १ एप्रिल ते १६ जुलै या कालावधीत तब्बल ४ लाख २८ हजार मालमत्ता धारकांनी मिळून एकूण ५४४ कोटी रुपयांचा कर भरणा केला आहे.

मालमत्ता कर हा महापालिकेचा मुख्य उत्पन्नाचा स्त्रोत असून शहरात सुमारे ६ लाख ३० हजार मालमत्ता आजमितीस नोंदल्या गेल्या आहेत. शहरात निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमीन अशा 6 लाख 32 हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभाग कर वसूल करत आहे. गतवर्षी या विभागाच्या वतीने राबविलेल्या विविध उपक्रमात जनजागृती, जप्ती मोहीम, मालमत्ता धारकांना नोटीसा, नळ कनेक्शन बंद करणे कारवाई सुरु आहे. महापालिकेच्या वतीने १ एप्रिल ते ३० जून २०२५ या कालावधीत ऑनलाइन कर भरणाऱ्यांना १० टक्के सवलतीची सुविधा देण्यात आली होती. या सवलतीचा लाभ ३ लाख २३ हजार २३९ मालमत्ताधारकांनी घेतला.



महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने मालमत्ता धारकांसाठी ३० जून २०२५ पर्यंत संपूर्ण कराचा भरणा ऑनलाइन स्वरूपात केल्यास १० टक्के सवलत व कुटुंबातील महिलेच्या नावावर असलेल्या एका निवासी मालमत्तेवर ३० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येत आहे. तसेच ज्या मालमत्ताधारकांना यावेळी सवलत घेता आली नाही, त्यांच्या सोयीसाठी महापालिकेने १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत ऑनलाइन कर भरणाऱ्यांना ४ टक्के सवलत जाहीर केली आहे. नागरिक विविध पर्यायांचा वापर करून कर भरणा करत आहेत. ऑनलाइन प्रणाली, कॅश काउंटर, ईडीसी, आरटीजीएस, डिमांड ड्राफ्ट, BBPS अशा माध्यमातून कर भरणा सुरू आहे.

### अशी झाली रक्कम जमा

- ऑनलाइन : ३९४ कोटी ३३ लाख,
- रोख रक्कम : ३२ कोटी ७० लाख ८० हजार
- धनादेश : २५ कोटी ६१ लाख २३ हजार
- ईडीसी : ६ लाख ६ हजा
- आरटीजीएस : २४ कोटी ६२ लाख ८५ हजार
- डीडी : ७४ लाख ३२ हजार
- BBPS - १७ लाख ८३ हजार मालमत्ता कर

"ऑनलाइन कर भरणा मोहिमेला नागरिकांचा जो उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे, तो खरोखरच प्रशंसनीय आहे. आम्ही नागरिकांना अधिकाधिक सवलतीसह ऑनलाइन कर भरण्यासाठी प्रोत्साहन देत राहू. तीन लाख पेक्षा जास्त नागरिकांनी ऑनलाइन कर भरला आहे हे अत्यंत समाधानकारक आहे. महापालिकेच्या ऑनलाइन सेवेमुळे नागरिकांना घरबसल्या कर भरण्याची सुविधा मिळते. यापुढेही आम्ही अशा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत राहू.

**– प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

---


# गोवंश हत्या कायदा अधिक कडक करण्याची गरज

## दोषींना 5 वर्षांची शिक्षा व 1 लाख दंड व्हावा; आमदार जगताप यांची विधानसभेत मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

गोमातेला "राजमाते"चा दर्जा देत महाराष्ट्रात लागू असलेल्या गोवंश हत्या बंदी कायद्याची अधिक प्रभावी अंमलबजावणी व्हावी, तसेच या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना पाच वर्षांपर्यंत कठोर शिक्षा व एक लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात यावी, अशी ठाम मागणी आमदार शंकर जगताप यांनी महाराष्ट्र विधानसभेत आज (शुक्रवारी) औचित्याच्या मुद्द्याद्वारे केली.

शंकर जगताप यांनी स्पष्टपणे नमूद केले की, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ व त्यातील १९९५ आणि २०१५ मधील सुधारणा कायद्यानुसार संपूर्ण राज्यात गोवंश हत्या, वाहतूक, विक्री आणि अवैध व्यापारावर बंदी आहे. तरीही अनेक ठिकाणी या कायद्याचे सर्रास उल्लंघन होत असून, घरांमध्ये अथवा गुप्त ठिकाणी बेकायदेशीर गोवंश कत्तल सुरू आहे.




### कठोर शिक्षा व प्रभावी अंमलबजावणीची गरज

जगताप यांनी अधोरेखित केले की, दोषींवर फक्त कायदेशीर कारवाई पुरेशी नाही, तर पाच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा आणि एक लाख रुपये दंड अशी कठोर शिक्षा ठोठावणारा कायदा व्हावा. यासाठी कलम ५अ, ५ब, ५क आणि ५ड अंतर्गत स्पष्ट तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी गरजेची आहे.

### गोरक्षकांना संरक्षण आणि पोलिसांना विशेष अधिकारांची मागणी

गोरक्षकांना त्यांच्या सुरक्षेची गरज असल्याचे सांगत जगताप यांनी या कार्यात अडथळा आणणाऱ्यांवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३५३ अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचा विशेष अधिकार पोलिस आणि पशुसंवर्धन विभागाला द्यावा, अशी मागणी केली.

राज्यभर गस्त, तपासणी केंद्रे आणि समित्यांची आवश्यकता

या अवैध कारवायांवर लगाम घालण्यासाठी शंकर जगताप यांनी पुढील उपाययोजनांची गरज अधोरेखित केली:

राज्याच्या सीमा, महामार्ग व अंतर्गत मार्गांवर वाहन तपासणी केंद्रांची स्थापना

पोलिस आणि पशुसंवर्धन विभागाने संयुक्तपणे नियमित गस्त आणि गुप्त तपासणी

गावपातळीवर जनतेचा सहभाग असलेली समिती स्थापन

अवैध कत्तल किंवा व्यापाराची माहिती देणाऱ्यांसाठी बक्षीस योजना

### गोवंश रक्षणासाठी समर्पित भूमिका

**"गोमाता केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय नसून, तिचे रक्षण सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळे गोवंश हत्या प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी ही केवळ कागदापुरती न राहता, प्रत्यक्षात प्रभावी व्हावी," असे ठाम मत आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केले.**

# हवाई वाहतुकीत पुणे विमानतळाची झेप

## विमान वाहतुकीचे प्रमाण 7.5 टक्क्यांनी वाढून 68,830 वर पोहोचले

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाने गेल्या आर्थिक वर्षात विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. प्रवासी विमानात आणि मालवाहतुकीत (कार्गो) मोठी वाढ झाली आहे, अशी माहिती भारतीय विमानतळ प्राधिकरणांतर्गत (एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया – एएआय) पुणे विमानतळ प्रशासनाने गुरुवारी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

प्रसिद्धीपत्रकात नमूद केल्याप्रमाणे, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये १.०४५८ कोटी प्रवाशांनी विमानतळाचा वापर केला आहे. यात ९.८ टक्क्यांची वाढ झाली आहे. विमान वाहतुकीचे प्रमाण ७.५ टक्क्यांनी वाढून ६८,८३० वर पोहोचले असून, मालवाहतूक ११.८ टक्क्यांनी वाढून ४२,२९० टन झाली आहे. मे महिन्यात ९.३८ लाख प्रवाशांची हवाई वाहतूक करून पुणे विमानतळाने आतापर्यंतचा सर्वाधिक मासिक प्रवासी विक्रम नोंदवला. दरम्यान, मालवाहतुकीतही सातत्याने वाढ होत असून जून २०२३ मध्ये २,६५४ टन असलेली वाहतूक मे महिन्यात ४,२०० टनांवर गेली आहे.




विमानतळ परिसरात हवाई प्रवाशांच्या सुकर प्रवासासाठी नव्याने टर्मिनलचा याचा मोठा फायदा झाला आहे. या टर्मिनलचे उद्घाटन १० मार्च २०२४ रोजी पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आले. सुमारे ५२ हजार चौरस मीटरच्या या टर्मिनलमध्ये दर वर्षी ९५ लाख प्रवाशांना सामावून घेण्याची क्षमता असून, तासाभरात २,३०० प्रवासी सुलभ प्रवास करत आहेत. या टर्मिनलमध्ये ३४ ‘चेक-इन’ यंत्रणा, १५ लिफ्ट, ८ सरकते जिने, १० वातानुकूलित हलते पूल, ‘स्मार्ट डॉकिंग सिस्टिम’, प्रवासी साहित्य-पिशव्या तपासणी आणि वाहून नेणारी यंत्रणा आणि सुरक्षा तपासणीची यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असल्याचे नमूद करण्यात आले.

आंतरराष्ट्रीय दळणवळण सुविधेत वाढ झाली असून, पुण्याहून दुबई आणि बँकॉकसाठी थेट विमानसेवा सुरू करण्यात आली आहे. तसेच, सिंधुदुर्ग, नांदेड, जळगावसारख्या शहरांशीही हवाई संपर्क जोडल्याने ही शहरे आणखी जवळ आली असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले आहे.

> नवीन टर्मिनल, सुधारित सुविधांसह पुणे विमानतळ महत्त्वाचे हवाई केंद्र बनले आहे. प्रवाशांना आणखी सुलभ सुविधा देण्यासाठी विमानतळ प्रशासन प्रयत्नशील आहे.
> **– संतोष ढोके, संचालक, पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ.**

# पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठीचे पॅकेज जाहीर

## विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील सात गावांमधील 2 हजार 673 हेक्टरचे भूसंपादन केले जाणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी करण्यात येणाऱ्या भूसंपादनाचे सूत्र मुंबई येथील बैठकीत निश्चित करण्याबाबत गुरुवारी चर्चा करण्यात आली. त्यानुसार विमानतळासाठी सहमतीने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना त्या मोबदल्यापोटी एकूण जमिनीच्या दहा टक्के विकसित भूखंड आणि बाजारभावाच्या चार पट दराने मोबदला देण्याचा विचार असल्याचे सूत्रांनी सांगितले. भूसंपादनाच्या मोबदल्यासंदर्भातील पॅकेज निश्चित झाले, तर विमानतळ मार्गी लागण्याच्या दृष्टीने लवकरच एक पाऊल पुढे पडेल.

दरम्यान, ‘विमानतळासाठी थांबलेले सर्वेक्षण तातडीने पूर्ण करून भूसंपादनाची आवश्यक प्रक्रिया जिल्हाधिकारी कार्यालयाने सुरू करावी,’ अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. तर, ‘पुरंदर विमानतळावर मोठी विमाने उतरण्याची सोय असावी, त्यासाठी आतापासूनच आवश्यक ती काळजी घ्यावी. या विमानतळावर विमानांच्या हँगरचीही व्यवस्था असावी,’ असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.



विमानतळासाठी सन २०१३ च्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या कायद्यानुसार भूसंपादन करण्याचे निश्चित करण्यात आल्यानंतर विभागीय आयुक्तांनी तशी अधिसूचना जाहीर केली होती. मात्र, या कायद्यानुसार पुनर्वसन करण्याची तरतूद नसल्यामुळे भूसंपादनाच्या मोबदल्याचा निर्णय राज्य सरकारच्या पातळीवर होणे अपेक्षित होते. त्यानुसार मुंबईत झालेल्या बैठकीत महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या २०१९ च्या पुनर्वसन कायद्यानुसार भूसंपादन करण्याचा निर्णय घेण्याबाबत चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले.

**फडणवीस, पवार यांच्या उपस्थितीत मुंबईत बैठक**

मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत भूसंपादनाच्या मोबदल्याचे सूत्र निश्चित करण्याबाबत चर्चा झाली. जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, परिवहन विभागाचे अप्पर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य वित्त अधिकारी अनिशा गोदानी, महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष स्वाती पांडे आदी या वेळी उपस्थित होते.

### कुठल्या ठिकाणी भूसंपादन?

» विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी आणि पारगाव या सात गावांमधील २ हजार ६७३ हेक्टरचे भूसंपादन केले जाणार आहे. जिल्हा प्रशासनाकडून या सर्व गावांतील प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना यापूर्वी नोटिसा बजाविण्यात आल्या होत्या. या नोटीशींवरील हरकती-सूचनांची सुनावणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती. अडीच हजारांपेक्षा जास्त हरकती-सूचना जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाल्या होत्या. काही शेतकऱ्यांनी विमानतळाला पाठिंबा, तर काही शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला होता.

### मोबदल्यात काय मिळू शकते?

» सहमतीने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना भूसंपादन करण्यात येणाऱ्या एकूण जमिनीच्या १० टक्के परतावा. हा परतावा विकसित भूखंडाच्या स्वरूपात
» जमिनीच्या सध्याच्या बाजारभावाच्या चार पट रक्कम रोख स्वरूपात
» विमानतळ आणि अन्य प्रकल्पात प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांना नोकरीची संधी.

# सक्षमा प्रकल्पामुळे महिला आर्थिक 'सक्षम'

## महापालिकेचा सक्षमा प्रकल्प हा आमचे आयुष्य बदलण्यासाठी उपयुक्त ठरत असल्याच्या भावना व्यक्त केल्या आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागांतर्गत राबवण्यात येणारा सक्षमा प्रकल्प हा बचतगटांच्या महिलांना आर्थिक सक्षम करण्यास उपयुक्त ठरत आहे. या प्रकल्पांतर्गत जागृती महिला बचत गट आणि गुरूकृपा महिला बचत गटाच्या महिलांनी तब्बल ३ हजार १४५ स्कूल बॅगचे शिवण कामे पूर्ण करून तब्बल १२ लाख ५८ हजार रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे.

महिला बचत गटांना सशक्त व सक्षम करण्यासाठी, त्यांना नागरी व आर्थिक मुख्य प्रवाहाशी जोडण्यासाठी सक्षमा प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून प्रशिक्षण घेतलेल्या जागृती महिला बचत गट व गुरूकृपा महिला बचत गटाच्या महिलांना पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी स्कूल बॅग शिवण्याचे मिळाले काम पूर्ण केले आहे.

या दोन्ही बचतगटांना २९ मे २०२५ रोजी ३ हजार १४५ स्कूल बॅग शिवण्यासाठी कार्यादेश देण्यात आला होता. त्यानंतर या बचत गटाच्या महिलांनी वेगाने काम सुरू केले. साहित्य खरेदी, ३ हजार १४५ स्कूल बॅगचे शिवणकाम, या बॅगची गुणवत्ता तपासणी आणि शाळेमध्ये प्रत्यक्ष स्कूल बॅग पुरवणे, हे काम या महिलांनी केवळ एका महिन्यात पूर्ण केले.

जागृती महिला बचत गटाच्या पुष्पा सौदा, प्राची कदम, हर्षा जंगले आणि चित्रा मोरे, गुरुकृपा महिला बचत गटाच्या शिल्पा कणसे, सांगिता घुले, अनुराधा बेदरे, श्रावणी कणसे या महिलांनी स्कूल बॅग शिवण्याची १२ लाख ५८ हजार रुपयांची ऑर्डर यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. सक्षमा प्रकल्पांतर्गत प्रशिक्षण घेऊन स्कूल बॅग शिवण्याचे काम पूर्ण करणाऱ्या या महिलांनी खऱ्या अर्थाने आता स्वावलंबनाची वाट धरली असून त्यांच्या या कामाचे कौतुक होत आहे.



### सक्षमा रोजगारासाठी क्षितिज उघडणारी ठरली

» पुष्पा सौदा म्हणाल्या, 'हे काम पूर्ण करताना आम्ही जबाबदाऱ्या वाटून घेतल्या होत्या. काही महिलांनी शिवणकाम पूर्ण केले. तर काहींनी फिनिशिंग आणि पॅकिंगची जबाबदारी घेतली. सगळ्यांनी मिळून हा टप्पा यशस्वीपणे पूर्ण केला आहे. ही संधी आम्हाला सक्षमा प्रकल्पामुळे मिळाली आहे.'गुरुकृपा महिला बचत गटाच्या श्रावणी कणसे यांनी म्हणाल्या की, 'स्कूल बॅगची ऑर्डर मिळाली तेव्हा ती वेळेत पूर्ण करता येईल का, असे वाटत होते. परंतु आम्ही सर्व महिलांनी एकमेकांना साथ देत ती पूर्ण केली. आता आम्हाला विश्वास आहे की, आम्ही याहूनही मोठ्या ऑर्डर्स सहज पूर्ण करू शकतो. आमच्यासाठी ही ऑर्डर रोजगारासाठी क्षितिज उघडणारी ठरली आहे.'

### आयुष्य बदलण्यासाठी सक्षमा....

» महापालिकेचा सक्षमा प्रकल्प हा आमचे आयुष्य बदलण्यासाठी उपयुक्त ठरत असल्याच्या भावना जागृती महिला बचत गट आणि गुरूकृपा महिला बचत गटाच्या महिलांनी व्यक्त केल्या आहेत. जागृती महिला बचत गटाच्या प्राची कदम म्हणाल्या, 'यापूर्वी आम्ही फक्त आमच्या परिसरातच बॅग तयार करून विकत होतो. परंतु महापालिकेकडून मिळालेल्या स्कूल बॅगच्या ऑर्डरमुळे मोठी स्वप्न पाहण्याचा आत्मविश्वास मिळाला आहे. आमच्या बचत गटाला एखाद्या शासकीय संस्थेकडून अशी ऑर्डर प्रथमच मिळाली होती. ती वेळेत पूर्ण करता आली, याचा आनंद आहे.'

"स्कूल बॅग शिवण्याचे काम मिळाल्यानंतर ते पूर्ण करण्यासाठी बचतगटाच्या महिलांनी दाखवलेले कौशल्य, शिस्त आणि निश्चय उल्लेखनीय आहे. बचत गटाच्या महिलांना उपजीविका निर्माण करून देण्याचे हे एक शाश्वत मॉडेल आहे. शहरातील उद्योजक, व्यावसायिक यांनीही त्यांच्या कंपनी, संस्थेसाठी गणवेश, ऑफिस बॅग्स तसेच इतर साहित्य पुरवण्याचे काम करण्याची संधी सक्षमा अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या बचतगटांना दिल्यास नक्कीच या महिलांना कायमस्वरूपी रोजगार मिळेल."

- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

# सोमाटणे टोल नाका तत्काळ बंद करा, अन्यथा बेमुदत उपोषण करणार

## मंगळवार (दि. 22) पासून बेमुदत उपोषण करणार, असा इशारा स्वातंत्र्यसैनिक बाळासाहेब जांभूळकर आणि अन्य नागरिकांनी दिला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

येत्या मंगळवार (दि. २२) पासून बेमुदत उपोषण करणार, असा इशारा स्वातंत्र्यसैनिक बाळासाहेब जांभूळकर आणि अन्य नागरिकांनी दिला आहे. सोमाटणे टोलनाक्याने कोणत्याही सोई-सुविधा दिल्या नाहीत, त्याबरोबरच येथे टोलनाका करताना एकाही नियमाचे पालन न झाल्यामुळे आंदोलन करण्यात येणार आहे.

नियमबाह्य सोमाटणे टोलनाका तत्काळ बंद करावा, अन्यथा येत्या मंगळवार (दि. २२) पासून बेमुदत उपोषण करणार, असा इशारा स्वातंत्र्यसैनिक बाळासाहेब जांभूळकर आणि अन्य नागरिकांनी दिला आहे. सोमाटणे टोलनाक्याने कोणत्याही सोई-सुविधा दिल्या नाहीत, त्याबरोबरच येथे टोलनाका करताना एकाही नियमाचे पालन न झाल्यामुळे आंदोलन करण्यात येणार आहे.

यापूर्वी सोमाटणे टोलनाका बंद करण्याबाबत किशोर आवारे यांचे ११ डिसेंबर २०२३ रोजी उपोषण व १३ मार्च रोजी सोमाटणे येथे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांसह विविध संघटना, नागरिकांनी केलेल्या रस्ता रोको आंदोलनाची दखल घेऊन मंत्री रवींद्र चव्हाण यांनी यावर उपाय योजना करू, असे आश्वासन दिले होते. त्याची पुढे काहीच कार्यवाही झाली नाही

रस्ते परिवहन राजमार्ग मंत्रालय यांच्या राजपत्रानुसार सरकारी दप्तरी देहूरोड नावाने टोलनाक्याची नोंद आहे. परंतु सोमाटणे येथील टोलनाका उभारताना दोन टोलनाक्यांतील किमान अंतर साठ किलोमीटर असणे, नगरपालिका हद्दीपासून दहा किलोमीटर अंतर असणे, स्थानिकांसाठी सेवा रस्ता करणे, टोलनाक्याजवळ स्वच्छतागृह, पिण्यासाठी शुद्ध पाण्याची सोय करणे व मुदत संपल्यानंतर टोलनाका बंद करणे आदींपैकी एकाही नियमाचे पालन होत नसल्याचा आरोप जांभूळकर यांनी केला आहे. उपोषणात जांभूळकर यांच्यासह माहिती अधिकार कार्यकर्ते जयंत कदम, अरुण माने, सचिन भांडवलकर, जमीर नालबंद, किशोर कवडे आदींनी सहभागी होण्याचा इशारा दिला आहे.




### रवींद्र चव्हाण यांच्या आश्वासनानंतरही कार्यवाही नाही

» यापूर्वी सोमाटणे टोलनाका बंद करण्याबाबत किशोर आवारे यांचे ११ डिसेंबर २०२३ रोजी उपोषण व १३ मार्च रोजी सोमाटणे येथे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांसह विविध संघटना, नागरिकांनी केलेल्या रस्ता रोको आंदोलनाची दखल घेऊन मंत्री रवींद्र चव्हाण यांनी यावर उपाय योजना करू, असे आश्वासन दिले होते. त्याची पुढे काहीच कार्यवाही झाली नाही. केवळ स्थानिकांना तात्पुरती टोलमध्ये सूट देऊन हा विषय प्रलंबित ठेवण्यात आला. असाही आरोप करण्यात आला आहे.

# मर्यादा केवळ 20 जणांची; गर्दी शंभरांची!

## पुलाच्या जीर्ण अवस्थेमुळे आणि वाढत्या पर्यटकांच्या गर्दीमुळे अपघाताचा धोका गंभीर झाला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी गावाजवळील कुंड पर्यटनस्थळी कुकडी नदीवर असलेला झुलता पूल सध्या धोकादायक अवस्थेत आहे. पुलाच्या जीर्ण अवस्थेमुळे आणि वाढत्या पर्यटकांच्या गर्दीमुळे अपघाताचा धोका गंभीर झाला आहे. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलाची जबाबदारी स्वीकारावी, अशी जोरदार मागणी ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आली आहे.

अलीकडेच मुळशी तालुक्यातील कुंडमळा येथे झालेल्या पुलाच्या दुर्घटनेत निष्पापांना जीव गमवावे लागले. त्या पार्श्वभूमीवर टाकळी हाजी येथील झुलता पूल देखील धोकादायक स्थितीत असून, तत्काळ उपाययोजना न झाल्यास येथे देखील अशाच स्वरूपाची दुर्घटना होण्याची शक्यता ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.



### तातडीने कृती झालीच पाहिजे : ग्रामस्थांचा इशारा

**टाकळी हाजी ग्रामस्थांनी पर्यटन विकास निधीतून आरसीसी पूल, संरक्षक भिंती आणि संपूर्ण कुंड परिसरात सुरक्षा व्यवस्था उभारण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन निर्णय घ्यावा; अन्यथा गंभीर परिणामांना सामोरे जावे लागू शकते, असा इशारा त्यांनी दिला आहे.**

सार्वजनिक बांधकाम विभागाने सन 2011 मध्ये हा पूल बांधून ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित केला असला, तरी सध्याच्या आर्थिक मर्यादांमुळे ग्रामपंचायतीकडून दुरुस्ती शक्य नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. 'पुलाची देखभाल व डागडुजी ही आमच्याकडे का?' असा सवाल ग्रामपंचायत प्रशासनाकडून उपस्थित करण्यात आला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तांत्रिक पाहणी करून तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. तसेच, नव्या आरसीसी पुलासाठी पत्रव्यवहारही करण्यात आला आहे. सध्याचा फक्त 5 फूट रुंद पूल, नवरात्र, यात्रा व उत्सवकाळात होणाऱ्या गर्दीसाठी अत्यंत अपुरा आणि असुरक्षित आहे, असे स्थानिकांनी स्पष्ट केले आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर रांजणखळगे पाहण्यासाठी येथे पर्यटकांची मोठी वर्दळ होत आहे. झुलत्या पुलावरून निसर्गसौंदर्याचा आनंद घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लोक येत आहेत. परंतु, पुलाची क्षमता केवळ 20 व्यक्तींची असून, त्यापेक्षा अधिक गर्दी होत असल्याने दुर्घटनेचा धोका वाढला आहे, असा इशारा स्थानिक प्रशासनाने दिला आहे.

शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी गावाजवळील कुंड पर्यटनस्थळी कुकडी नदीवर असलेला पूल सध्या धोकादायक अवस्थेत आहे. पुलाच्या जीर्ण अवस्थेमुळे आणि वाढत्या पर्यटकांच्या गर्दीमुळे अपघाताचा धोका गंभीर झाला आहे.

### दुरुस्तीसह नवीन आरसीसी पुलाची मागणी

**ग्रामसभेच्या ठरावानुसार, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तांत्रिक पाहणी करून तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. तसेच, नव्या आरसीसी पुलासाठी पत्रव्यवहारही करण्यात आला आहे. सध्याचा फक्त 5 फूट रुंद पूल, नवरात्र, यात्रा व उत्सवकाळात होणाऱ्या गर्दीसाठी अत्यंत अपुरा आणि असुरक्षित आहे, असे स्थानिकांनी स्पष्ट केले आहे.**

### पोलिस बंदोबस्त आणि सूचनाफलकांची मागणी

**पर्यटकांच्या सुरक्षेसाठी ग्रामपंचायतीने शिरूर पोलिस ठाण्याकडे बंदोबस्तासाठी पोलिस कर्मचारी तैनात करण्याची विनंती केली आहे. तसेच, पुलावर सूचनाफलक, प्रवेश मर्यादा आणि नियमित तपासणी यांची आवश्यकता अधोरेखित केली आहे.**

---

# अहिल्यानगर- कल्याण महामार्ग यमदूत दीड वर्षात 20 जणांचा मृत्यू : 30 जण जखमी

## महामार्गाचे काम सुरू असल्याने वाहने अनियंत्रितपणे चालवली जात असल्याने अपघातांची संख्या वाढत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

अहिल्यानगर- कल्याण या राष्ट्रीय महामार्गावर 1 जानेवारी 24 ते 1 जुलै 2025 पर्यंत 31 अपघातांत 20 जणांनी आपला जीव गमावला असून 30 जण जखमी झालेले आहेत. त्यातच या महामार्गाचे काम सुरू असल्याने वाहने अनियंत्रितपणे चालवली जात असल्याने अपघातांची संख्या वाढत आहे.

अहिल्यानगर – कल्याण या राष्ट्रीय महामार्ग 61 वरील आळेफाटा पोलीस ठाण्यात अंतर्गत (पेमदरा ते पिंपरी पेंढार) 30 किलोमीटरच्या अंतरात गेल्या दीड वर्षात 20 गंभीर स्वरूपाचे अपघात झाले त्यात 20 जणांचा मृत्यू झाला. तर 11 जण जखमी झाले. तर 11 किरकोळ अपघात झाले यात 19 जण जखमी झाले. गंभीर व किरकोळ असे एकूण 31 अपघात झाले त्यात 20 मृत, 30 जखमी झाले, अशी माहिती क्राइम विभागाच्या रंजना मेचकर यांनी दिली.

वारंवार अपघात होत आहे. त्यातच काही ठिकाणी एका बाजुचे काम झाल्यानंतर साइटपट्ट्या भरलेल्या नसल्याने वाहनांचे अपघात होत आहेत. त्यामुळे संबंधित ठेकेदाराने साइडपट्ट्या लवकरात लवकर भरण्यात यावे, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे. काही ठिकाणी सिमेंटचा रस्ता पूर्ण झाल्यामुळे वाहनांचा वेग वाढला असून अपघाताचे प्रमाण देखील वाढले आहे.

दरम्यान अहिल्यानगरकडून येताना जुन्नर तालुक्याच्या हद्दीमध्ये



आल्यानंतर अणे घाट लागतो. या घाटाच्या उताराला वाहनांचा वेग मोठ्या प्रमाणात असतो. या ठिकाणी काही दिवसांपूर्वी एक ट्रक अंत्यविधी उरकून चालत असलेल्या नागरिकांमध्ये शिरला होता व यामध्ये झालेल्या अपघातात 5 जणांना आपला जीव गमवावा लागला होता. तसेच या मार्गावर अनेकवेळा अपघात होत आहे.

### काँक्रिटीकरणामुळे वाहतूककोंडी

**या मार्गावर सध्या रस्ता काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. संबंधित ठेकेदाराने हे काम करत असताना एका बाजुचे काम सुरू असताना दुसऱ्या बाजुला वाहने ये-जा करण्यासाठी रस्त्याचे तात्पुरते रुंदीकरण केले आहे, त्याला पावसामुळे वारंवार खड्डे पडत आहेत. अनेकवेळा दोन्हीही बाजुची वाहने येत असल्याने नेहमीच वाहतूककोंडी होत आहे.**

> **वाहनचालकांनी ड्रिंक अँड ड्राईव्ह करू नये. वाहन चालवताना धोकादायक पद्धतीने ओव्हरटेक करू नये तसेच रस्त्याच्या कडेला वाहनांना अडथळा होईल, अशी वाहने उभी करू नयेत. तसेच चारचाकी वाहनचालकांनी सिल्ट बेल्टचा वापर करावा जे वाहनचालक वाहतुकीच्या नियमांचे पालन करणार नाहीत, अशा वाहन चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.**
>
> **- विश्वास जाधव, पोलीस निरीक्षक, आळेफाटा**